(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

[१९९६] २ एस. सी. आर. ७३५

**युनियन टेरिटरी ऑफ चंदीगड**

*- विरुद्ध -*

**चरणजीत कौर**

१५ फेब्रुवारी, १९९६

[के. रामास्वामी आणि जी. बी. पटनायक, न्यायमूर्ती]

*भारताचे संविधान, १९५०/ फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ :*

*अनुच्छेद २२६ / कलम ४३३, ४८२ - खुनाच्या आरोपाखाली दोषी ठरलेल्या व्यक्तीस जन्मठेपेची शिक्षा सुनावन्यात आली - दोषीच्या मुदतपूर्व सुटकेकरीत अर्ज - तीनपेक्षा जास्त वेळा खटला तहकूब झाल्यानंतरही राज्याने प्रतिज्ञापत्र दाखल केले नाही या आधारावर उच्च न्यायालयाने दोषीची सुटका करण्याचे निर्देश दिले - असा निर्णय देण्यात आला कि : प्रतिशपथपत्र दाखल करण्यात सरकारने केलेल्या चुकीमुळे दोषीच्या सुटकेचे निर्देश देताना उच्च न्यायालयाने कायद्याची गंभीर चूक केली होती.*

फौजदारी अपील अधिकारिता : फौजदारी अपील क्र. २५३/१९९६.

फौजदारी संकीर्ण क्र.१३०२२-एम/१९९१ मधील फौजदारी संकीर्ण क्र. १३५५५-बी/९३/ मधील फौजदारी संकीर्ण क्र. ५३१७/९४ मध्ये पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने दि. ०१/०६/१९९५ रोजी दिलेल्या न्यायनिर्णय व आदेशावरून.

अपीलकर्त्यांसाठी सुश्री कामिनी जयस्वाल.

उत्तरवादी साठी विशाल मलिक आणि एम. एस. धिया.

न्यायालयाचा न्यायनिर्णय पुढीलप्रमाणे देण्यात आला :

विलंब क्षमापित केला.

अनुज्ञा मंजूर झाली.

प्रस्तुत अपील, फौजदारी संकीर्ण क्र. ६८७२/९५ मध्ये विशेष अनुज्ञेद्वारे पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने दि. १ जानेवारी १९९५ रोजी दिलेल्या आदेशावरून उद्भवते. कबूल केलेली तथ्ये अशी आहेत की उत्तरवादीला खुनाच्या गुन्ह्यासाठी दोषी ठरवण्यात आले आणि त्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. दि. २४ सप्टेंबर

१९८३ रोजी केलेल्या गुन्ह्यासाठी तिला दि. २ जून १९८४ रोजी दोषी ठरवण्यात आले हे मान्य आहे. दि. १९ सप्टेंबर १९८३ पासून ती कोठडीत आहे. तिच्या मुदतपूर्व सुटकेसाठी उच्च न्यायालयात अर्ज दाखल करण्यात आला आहे. तीनपेक्षा जास्त वेळा खटला तहकूब करण्यात आला असला तरी, राज्याने प्रतिशपथपत्र दाखल केले नाही या कारणावरून उच्च न्यायालयाने या आदेशात उत्तरवादीला सोडण्याचे निर्देश दिले आहेत. प्रश्न असा आहे की उच्च न्यायालयाला अनुच्छेद २२६ अंतर्गत किंवा फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ४८२ अंतर्गत (थोडक्यात, "संहिता") कैद्याला सोडण्याची अधिकारिता आहे का?

संहितेचे कलम ४३३ सरकारला, समुचित प्रकरणात, शिक्षा सुनावलेल्या व्यक्तीच्या संमतीशिवाय, शिक्षा कमी करण्याचा आणि दोषीला मुदतपूर्व सोडण्याचा अधिकार देते. खंड (बी) मध्ये आजीव कारावासाची शिक्षा , जास्तीत जास्त १४ वर्षे इतक्या मुदतीसाठी इतक्या कारावासाची शिक्षा किंवा द्रव्य दंडाची शिक्षा उपबंधित करण्यात आली आहे. निःसंशयपणे, तिने १४ वर्षांची शिक्षा देखील भोगली नाही, जी संहितेअंतर्गत भोगण्यासाठी आवश्यक असलेली किमान अनिवार्य शिक्षा आहे. निःसंशयपणे, तिने १४ वर्षांची शिक्षा देखील भोगली नाही, जी संहितेअंतर्गत भोगण्यासाठी आवश्यक असलेली किमान अनिवार्य शिक्षा आहे. जास्तीत जास्त, न्यायालय, आमुचित प्रकरणात, जेथे कैद्याने अनिवार्य किमान शिक्षा भोगली आहे, तेथे केवळ योग्य सरकारला शिक्षा कमी करण्याचा विचार करण्याचे आणि विशिष्ट दोषीला मुदतरपूर्व सोडण्याचे निर्देश देऊ शकते. याव्यतिरिक्त अजून काहीही करू शकत नाहीत. कैद्यांच्या वर्तणुकीच्या आणि इतर संबंधित परिस्थितीच्या आधारे सरकार अशा निर्देशांचा विचार करेल आणि त्यावर कारवाई करेल. अशा प्रकारे विचारात घेतल्यास, आमचे असे मत आहे की उच्च न्यायालयाने अपीलकर्ता-सरकारने प्रतिशपथपत्र दाखल करताना झालेल्या चुकीमुळे दोषीच्या सुटकेचे निर्देश देताना कायद्याची गंभीर चूक केली होती.

त्यानुसार अपील अनुमत करण्यात आली.

जी. एन.

अपिल अनुमत करण्यात आली.

**अस्वीकरण**

"या  न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय  हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता  विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी वैध मानला जाईल."